**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multi-Disciplinary E-Journal

# नव्वदोत्तर फुले—आंबेडकरी कविता

**डॉ. हेमंतकुमार बागडे**
कार्यकारी प्राचार्य तथा मराठी विभागप्रमुख
इंदिरा गांधी कला—वाणिज्य महाविद्यालय,
कळमेश्वर, जि. नागपूर
hemantkumarbagde@gmail.com
मो. ८७९३२२१४७६

---

**प्रस्तावना**

१९९० नंतरची मराठी फुले—आंबेडकरी कविता असा शब्दप्रयोग करतांना प्रस्तुत शोधनिबंधात १९९० नंतरच ज्यांनी काव्यलेखनास सुरूवात केली आहे असा अर्थ अभिप्रेत आहे. १९९० नंतरच्या मराठी फुले—आंबेडकरी कवितेचा विचार करताना अपरिहार्यपणे नवकविता आणि फुले—आंबेडकरवादी कविता याचा विचार करणे आवश्यक ठरते. नवकविता आणि फुले—आंबेडकरी कविता यांच्या प्रेरणा परस्परविरोधी आहेत. त्यांच्यातील आशय, जीवनदृष्टी यातही तफावत आहे. नवकविता आणि फुले—आंबेडकरी कविता हा मराठी काव्यप्रवाहातील सांस्कृतिक संघर्ष होय असे म्हणता येईल. कारण मराठी साहित्याच्या परिप्रेक्षात १९९० नंतर फुले—आंबेडकरी कवितेच्या क्षितिजावर जे तारे प्रकाशमान झाले, त्यांनी आपल्या कवितेतून नव्या वाटा स्वीकारलेल्या दिसून येतात. नव्वद नंतरच्या फुले—आंबेडकरी कवितेने नवे वळण घेतले आहे. कारण कविता लिहिताना त्यांनी कविता या 'अभिव्यक्ती'च्या माध्यमाच्या आकृतीबंधाचेही भान ठेवलेले आहे. सोबतच माणसाला माणूस म्हणून ताठ मानेने उभे राहण्याची हिंमत देते. म्हणूनच नव्वद नंतरची कविता ही फुले—आंबेडकरी विचारांची कलात्मक अभिव्यक्ती आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये.

नवी पिढी अनुकरणात अडकली आहे, असे म्हटले जाते. पहिल्या पिढीचे अनुकरण या पिढीने केलेच नाही, असे नाही. मात्र अनुकरणातून बाहेर पडून स्वत:ची नवी वाट तयार करतो, तोच खरा कलावंत असतो. नव्वद नंतरच्या फुले—आंबेडकरी कवितेने जुने संकेत मोडण्याचे, जुन्या कवितेला अंतर्बाह्य बदलविण्याचे कार्य धडाडीने केले. या काळातील कवींच्या कलाकृतींचा आस्वाद घेत असताना व नव्या—जुन्या कवितांचा तुलनात्मक विचार करताना नवी पिढी जुन्या पिढीच्या हजारो मैल पुढे गेलेली असून, या पिढीतील प्रत्येक कवी कवितेच्या क्षेत्रात मैलाचा दगड झाल्याचे दिसते. इतिहास आणि वर्तमानाची सांगड घालणाऱ्या या कवितेने समकालीन जीवन आणि संस्कृतीचे पदर उलगडून दाखवले आहेत. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विश्वबंधुत्वाचा वसा घेऊनच अवघे विश्व ही कविता कवेत घेऊ पाहत आहे.

नवे आकलन मांडण्यासाठी जुने समजून घ्यावे लागते. परंतु, या नव्या कवींचे वैशिष्ट्य असे की, ते डोळ्यात तेल घालून समाजाचे निरीक्षण करीत असतात. फुले—आंबेडकर जीवनपद्धतीची संस्कृती आणि प्रत्यक्ष समाज यातील विसंगती हेरून या विसंगती कलात्मकरित्या मांडतांना भरकटत चाललेल्या समाजाला त्याची वाट दाखविण्याचे काम ही कविता करते. वाङ्मयीन संस्कृतीच्या वाटेवरून चालतांना पूर्वसुरींचे पाऊलठसे तुडवितच नव्यांना आपली वाट चालावी लागते. हे कवी सतत संघर्षशील न राहता संवादशील राहतात. संवादातून त्यांची समाजजीवनाशी, समाजघटकांशी असणारी मैत्री ते प्रत्ययाला आणून देत असतात.

**भाऊ पंचभाई**

आंबेडकरी चळवळीच्या झंझावाताने ज्या काळात सबंध वातावरण भारावले होते, त्या काळात असंख्य नवे कवी उदयास आले. त्यात प्रामुख्याने भाऊ पंचभाई यांचे नाव अग्रक्रमावर येते. त्यांनी विद्यार्थीदशेपासूनच आंबेडकरवादी चळवळींमध्ये सहभाग घेतला आहे. त्यांचा 'हुंकार वादळाचे' हा पहिला कवितासंग्रह १९८९ साली प्रकाशित झाला. या पहिल्या कवितासंग्रहाने त्यांचे फुले–आंबेडकरी कवितेतील स्थान निश्चित केले. त्यांची कविता संस्कृतीची समीक्षा करते. ही कविता स्वरांच्या मांडवाखाली उभी असली, तरी आपला प्रखरपणा ती कायम ठेवते आणि सशक्त आशय घेऊन अभिव्यक्त होताना म्हणते,

''विशाची जिथे रोवली रोपटी
त्या गावातले दूध प्यावे कसे.''

('हुंकार वादळाचे', पृ. ३)

इतकी प्रखर मूळावरच घाव घालणारी ही कविता आहे. दलितांसाठी इथल्या रोजच्या जगण्यात जणूकाही विषच मिसळले गेले आहे. जिथे सतत अन्याय–अत्याचार घडत आहे त्या गावाला आपले म्हणायला कवी तयार नाही. भाऊ पंचभाई यांच्या कवितेत स्वरसौंदर्य आणि काव्यसौंदर्य यांची छान गुंफण तयार झालेली आढळते. डॉ. यशवंत मनोहर यांच्या मतानुसार, ''आशय आणि रचनेच्या लावण्यामुळे ही कविता अतिशय सुंदर झाली आहे,''[१] हे विधान योग्य वाटते. पंचभाईंनी सुरेख गझला लिहिल्या. या गझलांमधून सामाजिक वास्तवाचा जळता आलेखच मांडला. जीवनाला 'पुन्हा हाक मारू', 'कसे', 'डोळे', 'किनारा कवीचा', 'भुक्यांच्या अंबरी', 'कोणीच यार नाही', 'मद्यक्रांती', 'जुने लोक', 'कौरुण्य', 'गाऱ्हाणे', 'कुणी नाही', 'आयुष्य मागले नाही', 'स्वप्न ताजे', 'आम्ही लढू नव्याने' इत्यादी गझलांनी कवीच्या मनातील जखमांचे अश्रू शब्दबद्ध झालेले आहेत.

जखमाळलेल्या गावाचा रहिवासी असलेल्या या कवीचे दु:ख संस्कृतीभर पसरलेले आहे. या दु:खाला अनेक काटेरी संदर्भ आहेत. अशा वेळी त्यांची कविता ही समूहाचाच आवाज व्यक्त करते. यादृष्टीने पाहता त्यांची 'गाऱ्हाणे' ही कविता अतिशय बोलकी वाटते–

''मी गायिलेच नाहीमाझे खरे गाऱ्हाणे
जगता मला न आलेमाझ्या मताप्रमाणे.'' ('हुंकार वादळाचे', पृ. ७६)

अशा प्रकारे भाऊ पंचभाई यांच्या कवितेतील शब्दरचना व आशयसौंदर्य वाचकांचे चित्त वेधून घेते. दलित–वंचित जीवनातील दु:ख आणि वेदनेचे भावस्पर्शी दर्शन त्यांची कविता घडविते.

**लोकनाथ यशवंत**

'आता होऊन जाऊ द्या!' हा लोकनाथ यशवंत यांचा पहिलाच कवितासंग्रह डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या प्रस्तावनेसह १९८९ साली प्रसिद्ध झालेला आहे. लोकनाथ यशवंत यांचा हा पहिलाच कवितासंग्रह असला तरी त्यांचे नाव मराठी काव्यविश्वाला अनेक वर्षांपासून परिचित आहे. डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या मते, ''लोकनाथ यशवंत हा दलित कवितेच्या क्षितिजावरील एक उगवता तारा आहे.''[२] तारा हा स्वयंप्रकाशी असतो हे वैज्ञानिकदृष्ट्या सत्य आहे. त्यांच्या कवितेच्या वैशिष्ट्यांनी पूर्वसुरींची वाट मोडीत काढून त्यांनी फुले आंबेडकरी कवितेत स्वत:ची अशी नवी वैशिष्ट्ये आणली असली पाहिजेत.

लोकनाथ यशवंत यांनी १९७४–७५च्या दरम्यान काव्यलेखनाला प्रारंभ केला आहे. त्यांनी तब्बल चौदा–पंधरा वर्षांनी आपला कवितासंग्रह काव्यरसिकांना सादर केला आहे. त्यामुळेच त्यांच्या कवितांविषयी रसिकांत एक उत्सुकता होती. त्यांच्या कवितांमधून समकालीन समाजवास्तव समर्थपणे उतरले आहे. ते लिहितात,''कसे ते लोक होते मुठी आवळून घरात बसायचे!

आज माझ्यामागे सगळे शस्त्र होऊन येताहेत.''('आता होऊन जाऊ द्या!', पृ. ४३)

तत्कालीन विद्रोह हा कलावंताच्या इच्छेतून येत नव्हता तर तो काळाच्या गरजेतून अभिव्यक्त झाला होता. ही अभिव्यक्ती व्यक्त करीत असतांना प्रत्येक जण दु:खाचे कारण शोधीत होता. सामाजिक अभिसरणाच्या नावाखाली अनेक मूलतत्त्ववादी प्रवृत्ती कार्यरत असतात.

कवी हे 'आंबेडकरी प्रेरणा' आदर्शभूत मानत असल्याने त्यांचा प्रवास अंधाराकडून प्रकाशाकडे असणार यात शंका नाही. साराच अंधार नाहीसा करण्याचे स्वप्न फुले—आंबेडकरवादी कवी पाहत असतात. या मानसिक गुलामगिरीतूनच दलितांवर दलितत्त्व लादले गेले. हे दलितत्त्व जसे सामाजिक तसे आर्थिक आहे. ही मानसिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी कवी शस्त्रांशिवाय काहीही हाती घेत नाही. हे शस्त्र काळानं त्यांच्या हाती सोपवलं आहे. त्याचा विद्रोहही काळाचंच अपत्य आहे. 'कुपाच्या बाहेर' या कवितेतून त्याचा प्रत्यय येतो. कवी लिहितात,

''जोहार करणारे आमचे हात
आम्ही कापून फेकले
आता शस्त्राशिवाय हातात काहीही नाही.''

('आता होऊन जाऊ द्या!', पृ. ५६)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'जोहार' हा शब्द शौर्याचे प्रतीक असल्याचे म्हटले असले तरी धर्मशास्त्राने शूद्रातिशूद्रांना एवढे लाचार केले होते की, त्यांच्या शौर्याची जागा लाचारीने घेतली होती. परंतु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उदयाने जोहार शब्द मागे पडला व त्याची जागा जयभीमने घेतली. कवीच्याच भाषेत सांगायचे तर,

''ते भेटले की त्यांना अदबीने
नमस्कार करावा.
एवढ्यानेही मानत नसतील तर,
जोहाराचे सोंग घेऊन
त्यांच्या पोटातून शिंग आरपार काढावे.''

('आता होऊन जाऊ द्या!', पृ. ५७)

अशाप्रकारे लोकनाथ यशवंत यांना आपण कोणत्या सांस्कृतिक जगाचे नेतृत्त्व करावयाचे याची एक निश्चित दृष्टी प्राप्त झालेली आहे. त्यांची कविता सामाजिक बांधिलकीच्या शोकात्म कथा तटस्थपणे मांडून अनुत्तरित प्रश्नाचा शोध घेण्याचा प्रयत्न करते. म्हणून त्यांची कविता समूहमनाचा क्रांतिकारी आविष्कार वाटते.

**अरुण काळे**

अरुण काळे हे फुले—आंबेडकरी कवितेच्या दुसऱ्या पिढीतील आघाडीचे कवी आहेत. 'सायरनचे शहर' हा यांचा दुसरा कवितासंग्रह १९९७ला प्रसिद्ध झाला आहे. अरुण काळे यांचा 'रॉक गार्डन' हा पहिला कवितासंग्रह १९९३ साली प्रसिद्ध झाला आहे. या काव्यसंग्रहातून त्यांनी सांस्कृतिक जमिनीवरील दगडी बागेतील म्हणजेच या मातीतील काळोखी पिकांच्या अनर्थाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. तर 'सायरनचे शहर' या काव्यसंग्रहात मूलतत्त्ववादाचे मूळ आणि कुळ यांचा शोध कवी अरुण काळे घेताना दिसून येतात. स्वत:च्याच कवितेचे पुढचे पाऊल आणि फुले आंबेडकरी कवितेचे विकसित रूप याचा प्रत्यय 'सायरनचे शहर' वाचताना लक्षात येतो.

सायरन म्हणजे धोक्याची सूचना! हे शहर धर्मांध असून या शहरात माणसाच्या सुरक्षिततेची कोणतीच हमी नाही. रक्ताचा रंग सर्वत्र सारखाच असतो. त्याप्रमाणे जातधर्म टिकणाऱ्या सर्वांच्या जळण्याचा एकच वास आसमंतात पसरलेला आहे. म्हणूनच—

''नागर संस्कृतीचे हे शहर अभिमानी
आरस्पानी गोसायाच्या शेट्टावाणी
या शहरात आपण केव्हाही होऊ शकतो
भुईसपाट...''

('सायरनचेशहर', पृ. ६४)

असे शहराच्या विविध पैलूंचे आक्राळविक्राळ रूप अरुण काळे यांच्या कवितेने साकार केले आहे. महानगरीय वास्तवाचे उग्र दर्शन घडविणे एवढेच या कवितेचे कार्य नाही, तर अनेक पातळ्यांवरील धोक्याची, संकटाची सूचना देणारे सायरनचे आवाज शहरभर पसरले आहेत. हे आवाज वेदनादायी आणि भयग्रस्त करणारे आहेत.

''मुक्या मारात शिणका उठाव्यात
तसे वाजतात सायरन
हे शहर आता वाटतेय सायरनचे...''

('सायरनचे शहर', पृ. १०)

या शहराने माणसाला नाकारले आहे, माणसाच्या मूलभूत गरजाही नाकारल्या आहेत, माणूस म्हणून जगू दिले जात नाही, माणूस हे एक मूल्य आहे असा विचार आंबेडकरांनी मानवी समाजाला दिला आहे. पण, तो विचार या शहरात आढळत नाही. कारण माणसांची येथे कोंडी करण्यात आली आहे. ''सायरन महत्त्वाचे! ते माणसाच्या सुरक्षिततेसाठी वाजतात व माणूस सुरक्षित नाही याचे निदर्शकही असतात. गिरण्या—कारखान्यांचे सायरन माणसांच्या रोजीरोटीची सोय करतात. पण, तेही शोषणाचे अड्डे, दुःखाची केंद्रेझालीत. युद्धाच्या वेळी विमान हल्ल्यांच्या संकटात सायरन वाजतात. आसमानी संकटाच्या वेळी, आगीच्या, अपघाताच्या वेळी वाजतात. थोडक्यात हे सायरनचे आवाज माणसाला रोजीरोटी देतात व त्याचबरोबर दुःखही देतात, थरकापही उडवतात. माणसाला हे थरकाप उडविणारे सायरन ऐकावे लागू नयेत असे सतत वाटत आले आहे.''[३] असे कवीने म्हटले आहे.

अशा प्रकारे फुले—आंबेडकरी विचारांची कविता म्हणून अरुण काळे यांची कविता श्रेष्ठ आहेच, उपरोध, उपहास हा त्यांच्या कवितेचा स्थायिभाव असला तरी आत्मानुभूतीचे कलात्मक आविष्करण हे त्यांच्या कवितेचे प्रबळ तत्त्व आहे.

**भुजंग मेश्राम**

हे दलित—आदिवासी चळवळीतून घडलेले कवी आहेत. त्यांच्या 'ऊलगुलान', १९९० या कवितासंग्रहाने त्यांचे मराठी कवितेतील स्थान निश्चित केले आहे. फुले—आंबेडकरी कवितेच्या विकसित रूपाची जाणीव या काव्यसंग्रहाने साहित्य जगताला करून दिली आहे. ऊलगुलानला दोन शब्द लिहिताना कवीने म्हटले आहे— ''ज्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन लिहू लागलो त्या बाबासाहेब आंबेडकरांचे हे जन्मशताब्दी वर्ष, तर म. जोतिबा फुल्यांचे स्मृति शताब्दी वर्ष या दोन महानुभवांना मी विनम्र अभिवादन करतो. दलित—आदिवासी चळवळीतून मी घडलो असल्याने या चळवळींबद्दल व त्यातील असंख्य मित्रांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.''[४] कवीच्या या मनोगतावरून त्यांची फुले आंबेडकरी विचारांशी असलेली नैतिक बांधिलकी स्पष्ट होते. भारतीय संविधानाने माणसाला समान मूल्य दिले असले; जातीयता,

अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरवला गेला असला तरी पूर्णत: भारतीय माणसाच्या मनातून गेलेली नाही. म्हणूनच या जातीच्या उतरंडीला सशक्तपणे विरोध करताना कवी म्हणतात,

''नामंजूर मला गोंड–परधान–थोटीची उतरंड...
वनवासाची गोड गाणी
शिव्यांच्या शब्दकोशातला कातोडी
गोंडवानातली लाचार घोषणा! जयसेवा
पुस्तकातले मागास हिंदू, झाडीतले भामटे भोंदू.''

('ऊलगुलान', पृ. ८३)

संस्कृतीचा इतिहासच 'ऊलगुलान'मधून कवी आपल्यासमोर उभा करतात. त्यांच्या कवितेतून येणारा आंबेडकरी विचार सूक्ष्मपणे शोधणे व त्याचा अन्वयार्थ लावणे हे महत्त्वाचे ठरते. 'चर्चा' या कविते,

''मी साकारतो एक अंतर्बाह्य बोधीवृक्ष
जिथे विसावू शकेल त्रिकाल सत्य
तू कसा नाकारतोस बिनशर्त त्याला?.''

('ऊलगुलान', पृ. १८)

अशी स्पष्ट कबूली देताना कवी येथील समग्र व्यवस्थेलाच 'तू कसा नाकारतोस बिनशर्त त्याला?' असा प्रश्न विचारतो. या प्रश्नातूनच 'ऊलगुलान'मधील कवितांची शोधयात्रा सुरू होते. या संदर्भात, ''दलित कवितेच्या विकसित रूपाची जाणीव या कवितासंग्रहाने साहित्य जगताला करून दिली आहे.''[५] हे महेंद्र भवरे यांनी मांडलेले मत योग्य वाटते.

अशाप्रकारे माणसाचे माणूसपण हिरावून घेणाऱ्या परंपरा स्पष्ट करणे आणि वृत्ती प्रवृत्तीचे तिरकस स्पष्टीकरण करून विद्रोह पुकारणे हे भुजंग मेश्राम यांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे. यातून व्यक्त होणारा विद्रोह थेटपणे, माणसाला नाकारणाऱ्या त्या त्या केंद्राच्या, परंपरांच्या पार्श्वभूमीवर प्रकट होतो.

**प्रज्ञा पवार**

नव्वदोत्तर फुले–आंबेडकरी काव्यप्रवाहातील एक महत्त्वाचे नाव म्हणजे कवयित्री प्रज्ञा पवार. त्यांचे आजपर्यंत 'अंत:स्थ' १९९३, 'उत्कट जीवघेण्या धगीवर' २००२, 'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा' २००७, 'आरपार लयीत प्राणांतिक' २००९ आणि 'दृश्यांचा ढोबळ समुद्र' २०१३ प्रकाशित झालेले आहेत. यांचा 'अंत:स्थ' हा कवितासंग्रह फुले आंबेडकरी कवितेतील एक महत्त्वाचा काव्यसंग्रह आहे. परंपरेच्या चिरेबंदी वाड्याला हादरे देत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या कवितेला 'अत्त दीप भव'ची क्रांतिदिशा दिली होती. ही स्त्रीमुक्तीची दिशा होती. धर्म, रूढी, प्रथा, परंपरा, संस्कार अशा कोणत्याही रूपात वावरणारे पिंजरे आंबेडकरी विचाराला मान्य नाहीत. रूढीचे हे पिंजरे स्त्रीला आणि असंख्य पुरुषांनाही माणूसपणापासूनच वंचित करून ठेवतात. आंबेडकरी विचाराने प्रज्ञा पवार यांच्या प्रतिभेला हे 'अंत:स्थ' भान दिले आहे.

''आपल्यातच किती अंत:स्थ कप्पे
वावरत असतात
एकमेकांना अनोळखी असतात...''

असे म्हणणाऱ्या कवयित्री स्त्रीमनाचे हे कप्पे नि जाणिवा शब्दांतून फुलविण्याचा वसा घेतात.

''अस्तित्त्वाच्या सनातन अलगुजाची लय
कधी नाकारली नव्हतीच
पण निराश्रित होऊ नये
जगण्याचा लोभस संवाद
यासाठीच हा समंजस आकांत''

असा समंजस आकांत व्यक्त करणारी आत्मशोधाची ही जाणीव शब्दांतून त्या व्यक्त करतात. ''शोषित स्त्री जेव्हा मनातला व डोक्यातला काळोख घेऊन उजेडाच्या मार्गावर चालू लागते आणि आत्मभान निर्माण करण्यासाठी शब्दांचे रान तुडवू लागते, तेव्हा तिला अनुभवांची आरास नको असते, वेदनेची सजावट नको असते. आत्मशोधाची मशाल हेच तिचे शस्त्र आणि अंधाराला चूड लावणे हेच तिचे ब्रीद ठरते. अशा वेळी शब्दबंबाळ विद्रोहापेक्षा भावनेच्या उमाळ्याचे मूळ ती शोधू पहाते.''[६] असे डॉ. ज्योती लांजेवार 'अंत:स्थ'मधील कवितांसंबंधी म्हणतात.

एकंदरीतप्रज्ञा पवार यांची कविता अत्यंत प्रगल्भ, शांत, एकसूरी न होता ती आत्मशोधाची जाणीव समर्थपणे प्रकट करते, हे त्यांच्या कवितेचे महत्त्वाचे विशेष आहे.

**केतन पिंपळापुरे**

केतन पिंपळापुरे यांचा 'सूर्यकंकण' हा १९९५ साली प्रकाशित झालेला कवितासंग्रह. कवी आपल्या काव्यसंग्रहाच्या मनोगतात लिहितात, ''चार–दोन पुस्तके वाचता वाचताच काहीतरी केले पाहिजे, अशी जाणीव मनात रूजली आणि माणसांच्या श्रमाच्या, रक्ताच्या, घामाच्या, अश्रूंच्या आणि प्रेमाच्या कविता लिहू लागलो. ज्या आंबेडकरी समाज, समूहातून आलो त्यांच्या व्यथा, वेदना जवळून पाहिल्या. स्वत: भोगल्या. जे भोगलं... जे जगलो ते शब्दांत मांडलं.''[७] हे त्यांचे शब्द फारच महत्त्वाचे आहे.

केतन पिंपळापुरे यांची कविता ही एका कार्यकर्त्यांच्या प्रगल्भ मनाची कविता आहे. कविता शब्दातून जन्म घेते, परंतु कवी म्हणतो आम्हालाही शब्दच जन्म देतात आणि शब्द अनेक पद्धतींनी साकार होतात. काही शब्द नुसतेच माणसांकडे पाठ फिरवून प्रतिक्रांतीची बाजारू मैफल सजवीत असतात. म्हणूनच कवी म्हणतात,

''ज्याच्या शब्दांना कधी फुटलीच नाही
माणसांसाठी मायेची पालवी
ते शब्दांचे जादूगार आमचे आदर्श नाहीत...
वा त्यांचे कॉस्मेटिक शब्दही...''

इथे शब्द आमचे अस्तित्त्व म्हणायची जाणीव ही आत्मशोधाची जाणीव आहे. शब्दासंबंधीची ही जाण आकाशातून पडत नाही, तर ती जीवनरूपी वणव्याच्या अनुभवातून उगवते. कवी लिहितात,

''या भणंग जिंदगीने मला
फुलांची गाणी गाऊ दिली नाही
म्हणून मी अग्नीची अंगाई
तुमच्यासाठी लिहून ठेवली आहे.''

आपल्या शब्दांना माणसाच्या मायेची पालवी फुटलेली नसेल, वा आपले शब्द अग्नीची अंगाई गीत नसतील, तर कविता लिहायची कशासाठी? शब्द, कविता आणि मायेची पालवी ही फुले आंबेडकरी विचारसरणी असणाऱ्या कवीची कविता आजच्या काळातही आपले अस्तित्त्व टिकून ठेवते.

केतन पिंपळापुरे यांचा क्रांतीवर विश्वास आहे. जी स्थिती आता आहे ती बदलेल, समतेचे राज्य येईल एवढेच नव्हे, तर त्यासाठीच आमचा लढाईचा करार आहे. म्हणून कवी स्पष्टपणे म्हणतात,

''एक दिवस धगधगेलच ही माती
उद्याचा दिवस आमचा असेल
आज छाटल्या गेलेल्या हातांना
उद्या धारदार कोंब फुटलेला असेल.''

अशाप्रकारे फुले आंबेडकरी कवितेत केतन पिंपळापुरे यांची कविता परिवर्तनाची वाट चालणारी कविता आहे. त्यांनी या देशातील दु:खी, दलित, वंचित लोकांच्या सांडलेल्या रक्ताचा हिशेब मागितला आहे.

**महेंद्र भवरे**

फुले—आंबेडकरी काव्यप्रवाहातील नव्या वाटा चोखाळणाऱ्या कवींपैकी एक नाव म्हणजे महेंद्र भवरे हे होत. त्यांच्या 'चिंताक्रांत मुलुखाचे रूदन' १९९८ या कवितासंग्रहाने फुले आंबेडकरी कवितेत मोलाची भर घातलेली आहे. त्यांची कविता व्यक्तिमत्त्व आणि वेगळेपण जोपासून रचनेच्या दृष्टीने काही नवे प्रयोग करताना दिसते. 'चिंताक्रांत मुलुखाचे रूदन' या शीर्षकावरूनच पारंपरिक मुलुखापेक्षा चिंताक्रांत मुलुख लक्षात येतो. विदर्भ आणि मुंबई या मुलुखाच्या जीवन जाणिवा, महानगरीय जीवनाच्या अनुषंगाने होणारी घुसमट या कवितेत प्रकट होते आणि त्याचबरोबर गावगाड्याच्या अनुषंगाने येणारी सामाजिक, सांस्कृतिक घुसमटही प्रकट होते. या घुसमटीचे वर्णन करताना कवी म्हणतात,

''उंदराने कुरतडून टाकावे रित्या उतरंडीचे काठ
भाडखाऊ हुजरे तसे उरावर दिनरात
कोंडवि श्वासाचे सर्वदूर मुलुख
मुलुखाचे चिंताक्रांत रूदन
आवंढाही गिळता येत नाही''

'गळत जाणाऱ्या आसवांसारखे गळत राहावे लागते' असा हा मुलुख आहे. दैनिक जखमात चिघळणारं कुबट पुवाचं रोधन, हरघडीला वटवट करणारी नपुंसक पुटपुट, या पसाऱ्यात आडवा उताणा होऊन चारी मुंड्या चित झालेला देह... हे चिंतन यात प्रकट झालेले आहे. त्यातून कवीचे स्वत्व जाणवते. कवी लिहितात,

''सांग कुठल्या वांझाट युगाचे
दुधबोळे गिळतोय आपण''

असे षंढत्त्व घेऊन बसलेले वस्तीला आसवांचा पूर आलेला.

''कोणत्या शतकाचे हे फलित
कोणत्या शतकाचे हे अर्भक
ज्याच्या लव्व्यानं आम्ही झालोय विकलांग
...कोणत्या युगाचे पशू आपण.''

असे चिंताक्रांत मुलुखाचे विकलांग झालेले जगणे कवींनी जळजळीत शब्दांत व्यक्त केले आहे. कवी जेव्हा बुद्धविचाराचे वहन आपल्या जाणिवेतून नेणिवेत करतात तेव्हा त्यांच्या कवितेतील विचार हा या

विचारधारेतून येतो. त्यांना अभिप्रेत असणारी बुद्धाची विचारधारा ही फुले आंबेडकरी विचारधारेशी सुसंबद्ध असते.

एकंदरीत महेंद्र भवरेयांची कविता ही चिंताक्रांत मुलुखाचे रूदन नाही तर ती चिंतन आहे. या निष्कर्षाप्रत कवितेच्या आस्वादातून यावे लागते. कारण त्यांची कविता ही नुसते दु:ख मांडून थांबत नाही तर ती त्या दु:खावरचा उपाय थेट सुचवते.

**माधव सरकुंडे**

माधव सरकुंडे यांचा 'मनोगत' हा कवितासंग्रह १९९७ मध्ये प्रकाशित झालेला आहे. यांच्या कवितेत एकाचवेळी स्वत्व, समाजदर्शन, आत्मबोध व समाजबोध अशा सृजनशील द्वंद्वातून रूपास आलेली अभिव्यक्ती आहे. म्हणून इतिहासाच्या आकलनातून 'मनोगत'मधील कविता साकार झाली आहे. त्यासाठी कवीने योजलेली शब्दकळा आणि भाषासंकेत आदिवासींच्या जगाबरोबरच समकालीन जगाचे एक भीषण स्वरूप स्पष्ट होते. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने घालणारी सनातनी व्यवस्था जिने माणसाला मूक करून जनावराच्या पातळीवर पोहोचविले अशा व्यवस्थेचा निर्देश ही कविता करते. त्यातून बांधिलकीच स्पष्ट होते. कवी म्हणतात,

''माझा धर्म माणसाचा, माणसासाठी तळमळतो
माणसाचे दु:ख पाहून मायी सारखा कळवळतो
चिऊचा धर्म माझ्या पिल्यांसाठी वणवणतो
ज्यांचे गाणे गेले त्यांच्यासाठी गुणगुणतो.''

('मनोगत', पृ. ३५)

या ओळीतील मानवतावादाचा आविष्कार पाहिला म्हणजे कवीची आत्मशोधाची जाणीव प्रत्ययाला येते. आपल्या समूहमनाच्या दु:खाला शब्द देण्याचे कार्य ही कविता करते. कारण कवी हे ज्या जगातून, समूहातून आलेले आहेत त्या जगाचं स्वरूप स्पष्ट करतानाच स्वत:चीही ओळख करून देतात आणि समाजाचे रूपही स्पष्ट करतान,

''मी माडीया, मी आंध, मी गोंड, प्रधान
मांग महार ढोर चांभार मी
आणि ज्यांच्या नावावर माझ्या देशाने
जात नोंदविली ते सगळेच मी''

('मनोगत', पृ. ७)

इथे 'मी'चे आम्हीत रूपांतर होते आणि बहिष्कृताचे समूहमनच आविष्कृत होते.

अशाप्रकारे माधव सरकुंडे यांची कविता फुले–आंबेडकरी कवितेतील एका दुर्लक्षित जगाची पार्श्वभूमी घेऊन व्यक्त झाली आहे. आदिवासींच्या जगण्याचा भेदक आविष्कार या कवितेतून व्यक्त झाला आहे. त्यातून स्वत:बरोबरच समूहजीवनाचे रूप साकार झाले आहे.

**गौतम शिंदे**

गौतम शिंदे यांचा 'प्रवर्तक' काव्यसंग्रह म्हणजे आत्मचिंतन आणि आत्मजाणीव याचा ध्यास होय. प्रवर्तक जाणिवा असलेला हा कवी आपल्या समस्या सोडविण्यास कटिबद्ध आहे. त्याच बरोबर संघर्ष करण्यास प्रवृत्त झालेला आहे. हे करीत असताना कवी लिहितात,

''माणसं मारायची कला
आम्हाला येत नाही
आमच्या हातातल्या तलवारींना धार आहे
पण रक्ताची चटक नाही.''

'प्रवर्तक' या कवितेत आत्मशोधामुळे आत्मबळ प्राप्त होते याची प्रचिती येते. या 'प्रवर्तक' जाणिवेमुळे कवी स्वत:च्या कवितेबद्दल ''आंबेडकरी प्रेरणेची माझी कविता आहे आणि मला दलित कवी समजू नये'' असे ठामपणे मत नोंदवितो. तरी देखील गौतम शिंदे यांच्या कवितेत अस्मितेची जाणीव स्पष्टपणे आढळते.

अशा अनेक नव्वदोत्तर आंबेडकरी कवींनी आपल्या कवितातून आंबेडकरी विचार—जाणिवांचा विस्तार केला आहे. त्यामध्ये मनोहर तल्हार, अरविंद निकाळजे, बबन लोंढे, रंगराज लांजेवार, मधु गवई, आत्माराम राठोड, भास्कर खंदारे, गोविंद वाघमारे, संध्या रंगारी, डॉ. मच्छिंद्र चोरमारे, भूषण रामटेके, शैलेंद्र लेंडे, सुनील रामटेके, सुरेश कदम, सतेश्वर मोरे, अशोक कांबळे इत्यादी किंवा अशा अनेक कवींची नावे लिहिता येईल.

एकंदरीत फुलें आंबेडकरी प्रेरणेतून साकार झालेल्या या कवींचे कवितेंच्या प्रांतात मौलिक स्वरूपाचे योगदान आहे. पारंपरिक संस्कृती आणि समकालीन संस्कृती वास्तव यांची सांगड घालणाऱ्या या कवितेने नीतीच्या कक्षेतील विद्रोहाचा अंगीकार केला आहे. एक मानव म्हणून आलल्या अनुभूतीला संघर्षशील विचारप्रणालीशी जोंडून नव्याच अर्थाची प्रतिती घडविली आहे. देव,धर्म, स्मृती, श्रुती या व्यवस्थेने पावलोपावली उभारलेले तुरूंग, कावेबाज वाटा, गनिमी रस्ते इत्यादी सर्व गोष्टींचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष, कधी सूचक तर कधी परखड विवेचन केले आहे. वैचारिक उलथापाल आणि विपरीत समाजवास्तव यामुळे त्यांच्या कवितेतील आशय समृद्ध आणि संपन्न झालेला आहे. यावरून असे म्हणता येईल की, नवदोत्तरी फुलें आंबेडकरी जाणिवेच्या कवींनी आपल्या कवितेतून मराठी कवितेला नव्या भावविश्वाचे, नव्या अनुभवांचे आणि नव्या क्रांतीकारी जीवनदर्शनाची जोड करून दिली आहे.

## संदर्भ सूची

१) डॉ. यशवंत मनोहर यांनी 'हुंकार वादळाचे' या कवितासंग्रहाला दिलेली प्रस्तावना.
२) डॉ. गंगाधर पानतावणे यांनी 'आता होऊन जाऊ द्या!' या कवितासंग्रहाला दिलेली प्रस्तावना, पृ. ७.
३) अरुण काळे, 'सायरनचे भाहर' सत्यजीत प्रकाशन, नाशिक, १९९७, पृ. ३.
४) भुजंग मेश्राम : ऊलगुलान, कल्याण (पूर्व), १९९०, 'दोन शब्द'मधून.
५) डॉ. महेंद्र भवरे, 'दलित कवितेतील नवे प्रवाह', शब्दालय प्रकाशन, मुंबई, २००१, पृ. ६०
६) डॉ. ज्योती लांजेवार, 'दलित कवयित्रींची कविता', सुगावा प्रकाशन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणा विशेषांक, १९९३, पृ. ९०.
७) केतन पिंपळापुरे, 'सूर्यकंकण', पुणे, प्र. आ. १९९५, मनोगतातून.